ePaper
काय झाडी, काय डोंगर, एकनाथ शिंदे एकदम ओक्के... शहाजी बापू पाटील पुन्हा फॉर्मात

वर्ष - 9 । अंक -78 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- टीम इंडियाचा सुपरफ्लॉप शो!
- वीज चमकताच सामना थांबला!
- वडिलांनी गमावलेला सन्मान परत
- ‘आप’चा आमदार देशातून फरार!


www.mahaenews.com । सोमवार, दि. 10 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## स्थानिक स्वराज्य निवडणुका: हिंदुत्वाचा नवा गड उभारण्याची घोषणा

# पुण्यातून शिंदेचा हिंदुत्वाचा नारा!

## पुण्यात शिवसेना (शिंदे गट) आणि पतित पावन संघटनेची युती

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं बिगूल वाजलं असून, राजकीय पक्षांनी तयारीला वेग दिला आहे. काही ठिकाणी महायुती एकत्र लढण्याची शक्यता असताना, अनेक ठिकाणी स्वबळावर लढण्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर पुण्यात आज झालेल्या एका मोठ्या राजकीय घडामोडींनं चर्चेला उधाण आलं आहे — शिवसेना (शिंदे गट) आणि पतित पावन संघटनेनं युतीची घोषणा केली आहे. शिंदे आणि पतित पावन संघटनेची ही युती आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांपूर्वी राजकीय समीकरणं ढवळून काढणारी ठरू शकते. पुण्यातून सुरू झालेली ही राजकीय मोहीम आता राज्यभर हिंदुत्वाचा संदेश देत पसरण्याची शक्यता आहे.**



### उद्धव ठाकरेवर शिंदेंचा घणाघात

यावेळी बोलताना शिंदेंनी शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले, “बाळासाहेबांना नको होतं ते होऊ लागलं, म्हणून आम्ही उठाव केला. आमचं हिंदुत्व हे सत्तेसाठी नाही. सत्तेच्या खुर्चीवर बसल्यावर रंग बदलणारे आम्ही नाही. काही लोक राजकारणासाठी शब्द देतात, पण आम्ही प्रिंटिंग मिस्टेकवाले नाही!” शिंदेंनी पुढे सांगितलं की, “राजकारणात शब्दाला महत्त्व आहे. हिंदुत्व म्हणजे फक्त घोषणाबाजी नाही, तर ती आचरणातून दाखवायची भूमिका आहे.”

- राज्यात स्थानिक स्वराज्य निवडणुकांचं बिगूल वाजलं!
- पुण्यात शिवसेना (शिंदे गट) आणि पतित पावन संघटनेची युती
- “आमचं हिंदुत्व खुर्चीसाठी नाही!”
- “लाडकी बहीण योजना सुरूच राहील; अफवा पसरवू नका” — शिंदेंचा खुलासा
- बोरगावच्या बैलगाडा शर्यतीत ‘काय झाडी, काय डोंगर’चा गजर

या ऐतिहासिक मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेनेचे अनेक नेते तसेच पतित पावन संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचं आयोजन शिवसेना नेते योगेश कदम यांच्या पुढाकाराने करण्यात आलं होतं.

**हिंदुत्वाच्या निष्ठेचं प्रतीक—पतित पावन आणि शिवसेनेची एकत्र वाटचाल**

मेळाव्यात भाषण करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, “जो हिंदुत्व विसरला तो अस्तित्व विसरला, आणि जो अस्तित्व विसरला तो मेला. पतित पावन संघटनेचं काम हे हिंदुत्वाला बळ देणारं आहे. आमची आणि पतित पावनची विचारधारा एकच — ‘राष्ट्रहित आणि धर्मरक्षण’ हीच दिशा.” शिंदे यांनी सांगितलं की, “पतित पावनला जिथे माझी गरज भासेल, तिथे मी भाऊ म्हणून तुमच्या पाठीशी असेन.”

**लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांवर प्रत्युत्तर**

अलीकडेच राज्य सरकारच्या ‘लाडकी बहीण योजना’ संदर्भात अफवा आणि टीका सुरू झाली होती. विरोधकांनी आरोप केला होता की, सरकार ही योजना बंद करणार आहे. त्यावर शिंदेंनी पुण्यातून स्पष्ट भूमिका मांडली — “कोणी कितीही अफवा पसरवल्या तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. ही महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वाकांक्षी योजना आहे. काही लोकांना आमचं काम दिसत नाही, पण आम्ही शब्द पाळतो — लोकांचा विश्वास तोडत नाही.” सरकारने अडीच लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी ही योजना सुरू केली असून, लाभार्थ्यांना दर महिन्याला ₹१५०० आर्थिक मदत मिळते. शिंदेंनी सांगितलं की, “केवायसी प्रक्रियेने पात्र महिलांचा खरा आकडा समोर येईल, पण योजना कायम सुरू राहील.”

**बोरगावच्या बैलगाडा शर्यतीत ‘काय झाडी, काय डोंगर’चा गजर**

दरम्यान, सांगली जिल्ह्यातील बोरगाव येथे डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या पुढाकाराने देशातील सर्वात मोठी बैलगाडी शर्यत आयोजित करण्यात आली. हजारो बैलगाड्यांचा थरार अनुभवण्यासाठी प्रचंड गर्दी उसळली होती. या कार्यक्रमाला एकनाथ शिंदे आणि माजी आमदार शहाजीबापू पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान शहाजीबापूंनी नेहमीप्रमाणे आपल्या खास शैलीत भाषण करत, ‘काय झाडी, काय डोंगर, सगळं एकनाथ शिंदे एकदम ओक्के!’

**जमीन खरेदी गैरव्यवहार!** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वक्तव्य

# जमीन खरेदी चौकशीतून सत्य बाहेर येईल

## साठ ते सत्तर हजार कोटींचा आरोप



।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**‘कोरेगाव पार्क परिसरातील चाळीस एकर जागेच्या खरेदी व्यवहारप्रकरणी चौकशी सुरू झाली आहे. पार्थ पवार यांनी याप्रकरणी एक रुपयाचाही व्यवहार केलेला नाही. चौकशीतून वस्तुस्थिती आणि सत्य जनतेसमोर येईल,’ अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी दिली. ‘निवडणुका आल्या की आरोप होतात. माझ्यावरही काही वर्षांपूर्वी साठ ते सत्तर हजार कोटींचा आरोप झाला होता’, असेही त्यांनी सांगितले.**

अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने कोरेगाव पार्क परिसरातील महार वतनाची चाळीस एकर जागा बेकायदा खरेदी केल्याचे प्रकरण पुढे आले आहे. या पार्श्वभूमीवर बारामती येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी या जागा गैरव्यवहारावर प्रतिक्रिया दिली.‘या संदर्भातील मी स्पष्ट भूमिका यापूर्वीच मांडली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. त्यातून वस्तुस्थिती जनतेसमोर निश्चित येईल. या सर्व प्रकरणात एक रुपयाचाही व्यवहार झालेला नसताना कागद कसा होऊ शकतो, हेच समजत नाही. त्याचा खुलासा एक महिन्यात होईल. चौकशी समितीमध्ये चांगल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माझ्यावरही काही वर्षांपूर्वी साठ ते सत्तर हजार कोटींचा आरोप झाला होता. निवडणुका आल्या की आरोप होतात,’ असे पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘पारदर्शक काम केले, की बारामतीतील जमिनींचे कागद काढले जातात. माझ्या नावाचा वापर करून जवळच्या कार्यकर्त्याने किंवा नातेवाईकांनी काही सांगितले, तरी नियमात नसेल, तर ते काम अधिकाऱ्यांनी करू नये. पुरावे असतील, तर चौकशी झाली पाहिजे,’ असे पवार यांनी बारामती जमीन आरोपांबाबत भूमिका मांडली.दरम्यान, आगामी निवडणुकांबाबतही त्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, ‘बारामती आणि माळेगाव नगरपंचायतीचा कायापालट करून दाखवीन. काम करून घेण्याची जबाबदारी माझी असेल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवारपासून होत आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी पुणे शहर आणि ग्रामीण भागाचा दौरा आणि गुरुवारी बारामती नगराध्यक्ष उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहे. जेजुरी, सासवड, उरळी देवाची, दौंड, इंदापूर, खेड, आळंदी, तळेगाव दाभाडे, लोणावळा, जुन्नर या निवडणुकांवरही लक्ष आहे.’जय पवार बारामती नगरपरिषदेची निवडणूक लढविणार नसल्याचेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. जयबाबत मी तसे काही ऐकलेले नाही आणि तसे काही होणार नाही,’ असे पवार यांनी सांगितले. अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने कोरेगाव पार्क परिसरातील महार वतनाची चाळीस एकर जागा बेकायदा खरेदी केल्याचे प्रकरण पुढे आले आहे. या पार्श्वभूमीवर बारामती येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी या जागा गैरव्यवहारावर प्रतिक्रिया दिली.‘या संदर्भातील मी स्पष्ट भूमिका यापूर्वीच मांडली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. त्यातून वस्तुस्थिती जनतेसमोर निश्चित येईल. या सर्व प्रकरणात एक रुपयाचाही व्यवहार झालेला नसताना कागद कसा होऊ शकतो, हेच समजत नाही. त्याचा खुलासा एक महिन्यात होईल. चौकशी समितीमध्ये चांगल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माझ्यावरही काही वर्षांपूर्वी साठ ते सत्तर हजार कोटींचा आरोप झाला होता. निवडणुका आल्या की आरोप होतात,’ असे पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘पारदर्शक काम केले, की बारामतीतील जमिनींचे कागद काढले जातात. माझ्या नावाचा वापर करून जवळच्या कार्यकर्त्याने किंवा नातेवाईकांनी काही सांगितले, तरी नियमात नसेल, तर ते काम अधिकाऱ्यांनी करू नये. पुरावे असतील, तर चौकशी झाली पाहिजे,’ असे पवार यांनी बारामती जमीन आरोपांबाबत भूमिका मांडली.

### माझ्यावरही काहीवर्षांपूर्वी आरोप

बारामती आणि माळेगाव नगरपंचायतीचा कायापालट करून दाखवीन. काम करून घेण्याची जबाबदारी माझी असेल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवारपासून होत आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी पुणे शहर आणि ग्रामीण भागाचा दौरा आणि गुरुवारी बारामती नगराध्यक्ष उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहे. जेजुरी, सासवड, उरळी देवाची, दौंड, इंदापूर, खेड, आळंदी, तळेगाव दाभाडे, लोणावळा, जुन्नर या निवडणुकांवरही लक्ष आहे.

# आवक वाढल्याने मटारच्या दरात घट

## भेंडी, गवार, काकडी, वांगी, घेवड्या फळभाज्यांच्या दरात वाढ...



। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आवक वाढल्याने मटारच्या दरात घट झाली. घाऊक बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेत भेंडी, गवार, काकडी, वांगी, भुईमूग शेंग, गाजर, घेवडा या फळभाज्यांच्या दरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली.गुलटेकडीतील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून ८५ ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक कमी झाली.**

कर्नाटक, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, इंदूर, राजस्थानातून ८ ते १० टेम्पो गाजर, कर्नाटकातून ४ ते ५ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून ३ ते ४ टेम्पो शेवगा, तामिळनाडूतून २ ते ३ टेम्पो तोतापुरी कैरी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, ३ ते ४ टेम्पो भुईमूग शेंग, २ टेम्पो पावटा, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेशातून ४ ते ५ टेम्पो मटार, मध्य प्रदेशातून ८ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.पुणे विभागातून ५०० ते ४५० गोणी सातारी आले, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ३ ते ४ टेम्पो, टोमॅटो ७ ते ८ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, गाजर ३ ते ४ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंग ५० ते ६० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा १०० ट्रक अशी आवक झाली, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ५० ते ५५ टेम्पो अशी आवक झाली. पालेभाज्यांची आवक कमी झाल्याने दरात वाढ झाली आहे. पालेभाज्यांना मागणीही वाढली आहे.

### पालेभाज्यांच्या दरात वाढ

मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर एक लाख जुडी, तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली. पालेभाज्यांचे दर (शेकडा जुडी) – कोथिंबीर – १५०० ते २५००, मेथी – १२०० ते १८००, शेपू – १००० ते १५००, कांदापात – १००० ते २०००, चाकवत – ५०० ते १२००, करडई – ५०० ते १०००, पुदिना – ५०० ते १०००, अंबाडी – ५०० ते १०००, मुळे – १००० ते २०००, राजगिरा – ५०० ते १०००, चुका- ५०० ते १५००, चवळई – ५०० ते १०००, पालक – १५०० ते २५००.

## साडेसहा हजार कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

## पिंपरी-चिंचवडमध्ये आणखी

# नऊ ठिकाणी पंतप्रधान आवास योजना!

### ! डुडुळगाव येथील १ हजार १९० सदनिकेचा गृहप्रकल्पांचे इमारत बांधकाम सुरू !

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात आणखी नऊ ठिकाणी पंतप्रधान आवास योजना राबविली जाणार आहे. या योजनेद्वारे साडेसहा हजार सदनिका बांधण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील तब्बल साडेसहा हजार कुटुंबांना पक्के व हक्काचे घर मिळणार आहे.**



महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत मोशीतील बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, पिंपरीतील उद्यमनगर, आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारले आहे. तेथे एकूण ३ हजार ६६८ सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना देण्यात आल्या आहेत, डुडुळगावला १,१९० सदनिकेच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

**दुसऱ्या टप्प्यामध्ये योजना राबविण्यात येणार**

रावेत येथील रद्द झालेला गृहप्रकल्प पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच, मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी, ताथवडे, रावेत आणि चोविसावाडी अशा एकूण नऊ ठिकाणी महापालिकेच्या वतीने दुसऱ्या टप्प्यात ही योजना राबविण्यात येत आहे. महापालिकेने सुधारित विकास योजना आराखड्यात (डीपी) या आठ ठिकाणच्या जागा समाविष्ट आहेत.

**बेघरांसाठी शहरात तीन ठिकाणी प्रकल्प**

उर्वरित रावेत, ताथवडे, चोविसावाडी या तीन ठिकाणी एचडीएच गटासाठी (बेघरांसाठी घरे) गृहप्रकल्प आहे. रावेत येथे जुना तसेच, नवा असे दोन गृहप्रकल्प होणार आहेत. या नऊ गृहप्रकल्पांत साडेसहा हजार सदनिका उभारल्या जाणार आहेत. त्यासाठी आणखी किमान तीन ते पाच वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**हजारो कुटुंबांना परवडणाऱ्या किमतीत हक्काचं पक्कं घर मिळणार**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या या गृहनिर्माण प्रकल्पामुळे शहरातील हजारो कुटुंबांना परवडणाऱ्या किमतीत हक्काचं पक्कं घर मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. शहरातील वाढत्या घरांच्या भावावर उपाय ठरणारी ही योजना अनेकांसाठी नवी सुरुवात घेऊन येत आहे.

**पूर्णतेसाठी लागणार 3 ते 5 वर्षे**

या सर्व नऊ प्रकल्पांतून सुमारे 6,550 सदनिका तयार होतील. त्यांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी तीन ते पाच वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हजारो कुटुंबांचे 'स्वतःच्या घराचे' स्वप्न पूर्ण होणार आहे.

### असे आहेत गृहप्रकल्प


दुसऱ्या टप्प्यात योजना/ठिकाण/ प्रयोजन क्षेत्र (हेक्टरमध्ये)
मामुर्डी/ ईडब्ल्यूएस/ १.४४
पुनावळे/ ईडब्ल्यूएस /२.००
वाकड /ईडब्ल्यूएस/ २.००
दिघी /ईडब्ल्यूएस/ १.१४
वडमुखवाडी /ईडब्ल्यूएस /२.००
रावेत /ईडब्ल्यूएस /२.००
रावेत /एचडीएच/ २,००
ताथवडे/ एचडीएच/ ४.१०
चोविसावाडी /एचडीएच/ ३.५९

# उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी सेल

## ‘पीएमआरडीए' तत्पर; आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांची माहिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील उद्योग-व्यवसायवाढीसाठी येणाऱ्या अडचणींसह उद्योजकांच्या समस्या निराकरणासाठी 'पीएमआरडीए' तत्पर आहे. उद्योजकांच्या समस्या, प्रश्न अडचणी सोडविण्यासाठी तालुका स्तरावर सहायक नगररचनाकार आणि सहायक संचालक यांचा पूर्ण वेळ स्वतंत्र सेल सुरू करणार असल्याची माहिती महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.**



तालुका कार्यालयातील अधिकाऱ्यांचे अधिकार वाढवून बांधकाम परवानगी, फायर ना-हरकत प्रमाणपत्रांसह इतर कामकाज सुरळीत करण्यासाठी पीएमआरडीए तात्काळ निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने आकुर्डीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा घेण्यातआली, यावेळी ते बोलत होते. औद्योगिक असोसिएशनचे मोतीलाल सांकला, राजीव रांका, डेक्कन मेंबर ऑफ कॉ मर्स इंडस्ट्रियल असोसिएशनचे मायकल पीटर, वेस्टन महाराष्ट्र एमआयडीसी चेंबर असोसिएशन फेडरेशनचे अप्पासाहेब शिंदे यांच्यासह इतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या अडचणी मांडल्या. संबंधित अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले.

चाकण, रांजणगाव, हिंजवडी, तळेगाव, पिरंगुट आदी औद्योगिक वसाहतीमध्ये आगामी काळात होणाऱ्या विकासकामांच्या अनुषंगाने सादरीकरणातून उद्योजकांना माहिती देण्यात आली. यावेळी अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील यांच्यासह औद्योगिक असोसिएशनचे पदाधिकारी तसेच अधिकारी उपस्थित होते.

### तीन महिन्यांतून एकदा बैठक

औद्योगिक क्षेत्राचे प्रश्न निकाली काढण्यासाठी 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची दर तीन महिन्यांतून बैठक घेऊन त्यांचे प्रश्न सोडवणार असल्याचे आयुक्त डॉ. म्हसे यांनी स्पष्ट केले. यासह उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका, एमआयडीसी आणि 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून विकासकामे व्हावीत, यासाठी सामूहिक प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## भूमिका

# ‘हायड्रोजन बॉम्ब’ तर फोडला

**महाराष्ट्र, कर्नाटकपाठोपाठ हरियाणामध्ये मतचोरी झाल्याचा आरोप करीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग आणि भाजपला पुन्हा एकदा लक्ष्य केले आहे. कर्नाटकात प्रत्येकी एक लोकसभा व विधानसभा मतदारसंघात मतचोरी झाल्याचा आरोप त्यांनी केला होता.**

राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा मतदारसंघात सॉफ्टवेअरचा वापर करून सहा हजारांपेक्षा अधिक नावांची नोंदणी करण्यात आल्याची बाबही त्यांनी उघड केली होती.हरियाणामध्ये २५ लाख बनावट मतदार होते व त्यातून नुसती मतचोरी नव्हे तर ‘सरकार चोरी’ करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. राहुल गांधी गेले चार महिने मतचोरीचे सतत आरोप करीत आहेत. हरियाणामध्ये ब्राझिलियन मॉडेलचा १० मतदान केंद्रांवर २२ वेळा मतदानासाठी वापर करण्यात आल्याचा आरोप तर अधिकच गंभीर. या साऱ्या प्रकारांबाबत ती तरुणी अनभिज्ञ. हरियाणामधील मतचोरीचा आरोप म्हणजे राहुल गांधी यांचा ‘हायड्रोजन बॉम्ब’ असल्याचा काँग्रेसचा दावा आहे. बिहारमध्येही अशाच मतचोरीची भीती राहुल गांधी यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात लोकसभा ते विधानसभा निवडणुकीदरम्यान ७० लाख मतदारांची नोंदणी करण्यात आल्याची आकडेवारीच त्यांनी सादर केली होती. राज्यात अचानक एवढी मतदार नोंदणी कशी वाढली हे



विरोधकांना पडलेले कोडेच आहे. मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे किंवा घोळ असल्याचा आरोप काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष करतात. राज्यात तर काँग्रेस, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, मनसे, डावे पक्ष अशा सर्वच पक्षांनी मतदारयाद्या सुधारण्याची मागणी केली. हा फक्त विरोधकांचाच आरोप नाही, तर भाजपचे मंत्री आशीष शेलार यांनीही दुबार नावांच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले. फरक एवढाच की, शेलार यांनी केवळ मुस्लीम दुबार नावांचा उल्लेख केला. त्याला त्यांनी ‘व्होट जिहाद’ची उपमा दिली. मतचोरीबाबत राहुल गांधी सातत्याने करत असलेल्या आरोपाचा निवडणूक आयोग आणि भाजपकडून इन्कार केला जातो. हरियाणामध्ये मतचोरीचा आरोप झाल्यावर निवडणूक आयोगाने मतदारयादी जाहीर झाली, तेव्हाच आक्षेप का घेतला नाही, असा सवाल केला. राहुल गांधी यांनी हरियाणामधील ज्या दोन विधानसभा मतदारसंघांतील मतचोरीचा आरोप केला, त्या दोन्ही मतदारसंघांबाबतच्या याचिका न्यायालयात प्रलंबित आहेत. तेव्हा उच्च न्यायालयातील सुनावणीत ही बाब सादर करावी, असा सल्ला निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना दिला. आरोपांना उत्तरे देण्याऐवजी हा सल्ला निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक यंत्रणेने देणे हे चमत्कारिकच आहे. मतचोरी, दुबार नावे, मतदार याद्यांमधील घोळ असे आरोप राजकीय पक्षांकडून होतात, हे खरेतर निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे. विरोधकांनी आरोप केल्यावर त्याची खिल्ली उडवायची ही भाजपने अलीकडच्या काळात विकसित केलेली कार्यशैली. निवडणूक आयोगासारखी घटनात्मक यंत्रणाही भाजपच्या कार्यशैलीचा अंगीकार करू लागल्याचेच जाणवू लागले आहे. मतचोरी, मतदारांची नावे परस्पर वगळणे किंवा यादीत समाविष्ट करणे यावरून राहुल गांधी यांच्यासह विरोधी नेत्यांकडून करण्यात येणारे आरोप आणि या आरोपांचा निवडणूक आयोगाने खुलासा करण्याआधीच भाजपच्या नेत्यांकडून दिली जाणारी उत्तरे यावरून काहीतरी गडबड आहे हा समज सर्वसामान्यांमध्ये दृढ होऊ लागला आहे. राहुल गांधी नुसते आरोप करतात पण त्याचा अंतिम निष्कर्ष काय, याचे उत्तर कोणाकडेच नाही. काँग्रेस पक्ष, विविध नागरी संघटना, स्वयंसेवी संस्था मतदारयाद्यांमधील गोंधळाच्या विरोधात आवाज उठवीत आहेत. पण त्यातून साध्य काहीच होताना दिसत नाही. महाराष्ट्र, कर्नाटक तसेच हरियाणामध्ये मतचोरीवरून राहुल गांधी यांनी आकडेवारीनिशी आरोप केले पण निवडणूक आयोगाने ते सारे फेटाळून लावले. राहुल गांधी म्हणतात त्याप्रमाणे मतदार याद्यांमध्ये गैरप्रकार झाले असल्यास त्यात दुरुस्ती होणे आवश्यकच.विरोधी पक्ष प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत. दुसरीकडे, न्यायपालिकेलाही राजकीय नेते दोष देत आहेत. ‘मतदार याद्यांच्या घोळाच्या विरोधात न्यायालयात जाण्याचा आम्ही केविलवाणा प्रयत्न करणार आहोत’, असे विधान शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी करणे ही त्यांची हतबलता की न्यायपालिकेवरील अविश्वास?

## प्रासंगिक »

### ‘डोळसां’पुढील

***बुद्धिप्रामाण्य नाकारणारी एक गोष्ट मान्य केली तर पुढची साखळी आपोआपच सुरू होते...***

‘मानसिक तसेच शारीरिक अपंगत्व असलेल्या तुमच्या दोन मुली बऱ्या करतो’, असे सांगत पुण्यातील एका आयटी इंजिनीअरला तब्बल १४ कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या भोंदू बाबाचे आणि त्याच्या सहकाऱ्यांचे प्रकरण जितके संतापजनक तितकेच करुण म्हणायला हवे. आता त्या बाबाला आणि त्याच्या सहकाऱ्यांना अटक झाली असली तरी पुण्यासारख्या ‘राज्याची सांस्कृतिक राजधानी’, ‘विद्येचे माहेरघर’ आदी ख्यातीच्या शहरात कुणी एक भोंदूबाबा पोटापाण्यासाठी इंग्लंडपर्यंत जाऊन आलेल्या एका सुशिक्षित कुटुंबाला खुलेआम लुटतो याला काय म्हणायचे? कायदा सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेचा धाक नाहीसा होतो या व्यवस्थेने आपले काय करून घेतले आहे, ही यातली संतापजनक बाब. आणि कसली तरी अनामिक भीती घेऊन जगणारी अशी अनेक सुशिक्षित, सधन कुटुंबे श्रद्धेच्या नावाखाली अशाच कुठल्या तरी बुवा-बाबाच्या नादी लागून गंडे-धुपारे करत बसलेली असतात.

अनुशेषाचे ढळढळीत वास्तव समोर आणणाऱ्या दांडेकर समितीच्या अहवालावरून तयार झालेला जनाक्रोश व तो शमवण्यासाठी राज्य सरकारने उचललेली पावले, त्यातून निर्माण झालेली वैधानिक विकास मंडळे व त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली ती आजपासून बरोबर २५ वर्षांपूर्वी.

# अनुशेष हा शब्द गायब पण वास्तव तेच !

अनुशेषाचे ढळढळीत वास्तव समोर आणणाऱ्या दांडेकर समितीच्या अहवालावरून तयार झालेला जनाक्रोश व तो शमवण्यासाठी राज्य सरकारने उचललेली पावले, त्यातून निर्माण झालेली वैधानिक विकास मंडळे व त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली ती आजपासून बरोबर २५ वर्षांपूर्वी. म्हणजे साधारण २००० ते २००१ च्या दरम्यान. गंमत म्हणजे यानंतरच्या तीन वर्षांत, मंडळे अस्तित्वात असताना व राज्यपालांचे निर्देश पाळणे बंधनकारक असतानासुद्धा विदर्भाच्या वाटय़ाचा सर्वाधिक निधी पळवण्यात सरकार यशस्वी ठरले. सिंचन, रस्ते, आरोग्य, नोकरीतले प्रमाण यावर परखड भाष्य करणाऱ्या या अहवालावरची चर्चा नंतर हळूहळू मंदावत गेली व नंतर ती चक्क लोप पावली. तेव्हा नुकतीच जन्मलेल्या व आता तरुण असलेल्या पिढीला हा शब्दही ठाऊक नसेल अशी सध्याची परिस्थिती. यानंतर समोर आले ते शेतकरी आत्महत्यांचे रौद्र व अंगावर शहारे आणणारे रूप. यामुळे



केंद्र सरकार हादरले. पंतप्रधान मनमोहन सिंग विदर्भात आले. पुन्हा एकदा अनुशेषाचा मुद्दा तापला. त्याची दखल घेत केंद्रीय योजना आयोगाने डॉ. आदर्श मिश्रांच्या नेतृत्वात एक समिती नेमली. तिच्या अहवालात विदर्भावर निधी वाटपात अन्याय झाल्याचे दिसून आले. या समितीसमोर म्हणणे मांडताना राज्य सरकारने अनुशेष निर्मूलन ही आमची जबाबदारी नाही असे सांगत चक्क हात झटकले. मग केंद्राने थोडीफार मदत देऊ केली. कृषिविषयक कार्यक्रम राबवले. कर्जमाफीची योजना पहिल्यांदा आणली. ती केवळ विदर्भासाठी न राहता राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी लागू झाली व त्याचा सर्वाधिक लाभ मिळाला तो विदर्भाबाहेरच्या शेतकऱ्यांना. येथील आत्महत्यांचा प्रश्न तसाच राहिला. आजही त्याचे अक्राळविक्राळ स्वरूप कायम.अनुशेष हा शब्द फारच डाचतो व त्यावरून निर्माण झालेला असंतोष शमण्याचे नाव घेत नाही हे लक्षात आल्यावर सरकारने केळकर समिती नेमली. त्याच्या अहवालातून तालुका हा घटक निश्चित करून मागास भागाची नव्याने व्याख्या करण्यात आली व विदर्भ, मराठवाड्याच्या जोडीला उर्वरित महाराष्ट्रातील मागास भाग त्याला जोडले गेले. शासकीय दफ्तरातून अनुशेष हा शब्द गायब होण्याची प्रक्रिया सुरू झाली ती या अहवालापासून. आज कुणीही तो उच्चारताना दिसत नाही हे या अहवालाचे यश म्हणावे लागेल. भाजप सत्तेत नसेपर्यंत विधिमंडळात हा शब्द वारंवार यायचा. नंतर हा पक्ष सत्तेत येताच अनुशेष दूर झाला अशी हाकाटी सुरू झाली. हे मान्य की भाजपने या भागाकडे विशेष लक्ष दिले. निधीही पुरवला पण अनुशेषाचे मोजमाप काढणारी यंत्रणाच ठप्प करून टाकली. हे काम ज्या वैधानिक मंडळाकडे होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

अर्थव्यवस्थेला गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# 45 टक्के ‘स्टार्टअप’ महिलांचे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र ही स्टार्टअपची राजधानी असून देशात सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप हे महाराष्ट्रात आहेत. त्यात ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत. या स्टार्टअपमधूनच भविष्यात मोठे उद्योजक देशाला मिळतील आणि भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी व्यक्त केला.**

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती



एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या ‘इनोव्हेशन महाकुंभ २०२५’ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारताच्या स्टार्टअपमध्ये महाराष्ट्राचा वाटा १८ टक्के आहे.महाराष्ट्रात असलेल्या स्टार्टअप्सपैकी ४५ टक्के स्टार्टअप महिलांचे आहेत. ही संख्या लवकरच पुरुषांपेक्षा जास्त होईल आणि उद्योग विश्वात महिलांचे वर्चस्व असेल. महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवायची असेल, तर महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांची मोठी भूमिका असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धीमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. स्टार्टअपच्या विकासात अधिक कार्यक्षमता आणि गती आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे. सार्वजनिक विद्यापीठांमधील इनक्यूबेशन सेंटरसाठी राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.तसेच महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सवर विशेष भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्रॉंग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ.उज्वला चक्रदेव, ‘नॅक’चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.शिक्षणातील अवघड संकल्पना सोप्या व्हाव्यात आणि शिक्षण कंटाळवाणे न होता मनोरंजक व्हावे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण तंत्रज्ञान मंचच्या (एनईटीएफ) माध्यमातून शिक्षक प्रशिक्षणाचा आराखडा तयार करण्याचे काम करण्यात येत आहे. तसेच शिक्षक प्रशिक्षण आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्टार्टअप्सना पाठिंबा देण्याची योजना तयार करण्यात येत असल्याचे एनईटीएफचे अध्यक्ष अनिल सहस्रबुद्धे यांनी सांगितले. शिक्षक प्रशिक्षण आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्टार्टअप्सना पाठिंबा देण्याची एनईटीएफची योजना असल्याची माहितीही सहस्रबुद्धे यांनी दिली.एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या ‘इनोव्हेशन महाकुंभ २०२५’ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

महाराष्ट्रात असलेल्या स्टार्टअप्सपैकी ४५ टक्के स्टार्टअप महिलांचे आहेत. ही संख्या लवकरच पुरुषांपेक्षा जास्त होईल आणि उद्योग विश्वात महिलांचे वर्चस्व असेल. महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवायची असेल, तर महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांची मोठी भूमिका असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे.

# बुटक्या राधाचा जागतिक पातळीवर बोलबाला

## माणची राधा ठरली जगातील कमी उंचीची पाळीव म्हैस...

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सातारा जिल्ह्यातील बारमाही दुष्काळी तालुका म्हणून माणची ओळख आहे. याच माणमधील राधा नावाच्या बुटक्या म्हशीने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. मलवडी गावच्या त्रिबक दाजी बोराटे या शेतकऱ्याच्या गोट्यात मुऱ्हा म्हशीच्या पोटी जन्मलेल्या राधाची उंची केवळ दोन फूट आठ इंच (८९.८ सेमी) आहे. त्यामुळे माणची ही राधा ठरली आहे, जगातील कमी उंचीची पाळीव म्हैस.**

त्रिबक बोराटे यांच्या गोट्यात १९ जून २०२२ रोजी राधाचा जन्म झाला. राधा दोन वर्षांची झाल्यानंतर तिची उंची इतर म्हशींसारखी वाढत नसल्याचे बोराटे यांचे कृषी पदवीधर असलेले पुत्र अनिकेत यांच्या लक्षात आले. त्यानंतर राधाला कृषी प्रदर्शनामध्ये सहभागी करण्याचा निर्णय घेण्यात. राधा पहिल्यांदा सोलापुरातील श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात सहभागी झाली, त्यानंतर राधाचा बोलबाला सुरू झाला. त्यानंतर श्री सेवागिरी कृषी प्रदर्शन, पुसेगाव.इंदापूर कृषी प्रदर्शन, संगमनेर कृषी महोत्सव, कृषी उत्सव, निपाणी (कर्नाटक) आदी कृषी प्रदर्शनांमधून पारितोषिके पटकाविली. त्यानंतर अनिकेत



यांनी स्थानिक पशुधन विकास अधिकारी डॉ. शरद थोरात यांच्या मदतीने सर्व कागदपत्रे तयार करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न सुरू केले. अखेर २८ ऑक्टोबर २०२५ रोजी राधाची जगातील सर्वात बुटकी पाळीव म्हैस म्हणून नोंद झाली. इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्येही राधाचा नोंद झाली आहे.

उंचीचे जनुके राधामध्ये विकसीत न झाल्यामुळे राधाची उंची कमी राहिली आहे. राधाच्या आईची उंची चांगली होती. कमी उंचीमुळे राधा गाभण जाणे शक्य नाही. सामान्यपणे मुऱ्हा म्हशीची उंची पाच ते सहा फूट आणि वजन ५०० किलोच्या पुढे असते. राधाची उंची दोन फूट आठ इंच (८९.८ सेमी) आणि वजन केवळ २८५ किलो आहे, अशी माहिती पशूधन विकास अधिकारी डॉ. शरद थोरात यांनी दिली.सातारा जिल्ह्यातील बारमाही दुष्काळी तालुका म्हणून माणची ओळख आहे. याच माणमधील राधा नावाच्या बुटक्या म्हशीने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. मलवडी गावच्या त्रिबक दाजी बोराटे या शेतकऱ्याच्या गोट्यात मुऱ्हा म्हशीच्या पोटी जन्मलेल्या राधाची उंची केवळ दोन फूट आठ इंच (८९.८ सेमी) आहे. त्यामुळे माणची ही राधा ठरली आहे.

## राधा गाभण जाणे शक्य नाही

जगातील कमी उंचीची पाळीव म्हैस. त्रिबक बोराटे यांच्या गोट्यात १९ जून २०२२ रोजी राधाचा जन्म झाला. राधा दोन वर्षांची झाल्यानंतर तिची उंची इतर म्हशींसारखी वाढत नसल्याचे बोराटे यांचे कृषी पदवीधर असलेले पुत्र अनिकेत यांच्या लक्षात आले. त्यानंतर राधाला कृषी प्रदर्शनामध्ये सहभागी करण्याचा निर्णय घेण्यात.

## गमावलेला सन्मान परत — पोलीस दलात पुन्हा घेण्याचे मुख्यमंत्र्यांनी दिले आश्वासन

# वडिलांनी गमावलेला सन्मान परत

## गौडच्या वडिलांची नोकरी परत

। भोपाल ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर अनेक यशोगाथा समोर आल्या. यात आता २२ वर्षीय वेगवान गोलंदाज क्रांती गौडच्या यशोगाथेची भर पडली आहे. क्रांती गौडच्या गोलंदाजीमुळे भारताचा विजय तर झालाच, तसेच तिच्या वडिलांनी गमावलेला सन्मानही पुन्हा मिळवण्यास मदत झाली. क्रांतीच्या वडिलांनी पोलीस दलातील नोकरी गमावल्यानंतर १३ वर्षांपासून सुरू असलेला कुटुंबाच्या संघर्षाचाही अंत झाला. क्रांती गौडच्या वडिलांना पुन्हा एकदा सन्मानपूर्वक त्यांची नोकरी परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**




क्रांती गौडचे वडील मध्य प्रदेशच्या छतरपूर जिल्ह्यातील पोलीस दलात अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांना २०१२ साली चुकीच्या पद्धतीने काढून टाकण्यात आले. काही दिवसांपूर्वी टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत क्रांतीने वडिलांचा गौरव परत मिळावा, अशी इच्छा व्यक्त केली होती. शुक्रवारी भोपाळमध्ये मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या हस्ते क्रांती गौडचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वडिलांना पुन्हा नोकरीवर घेण्याचे प्रयत्न करू असे आश्वासन दिले.भोपाळमध्ये झालेल्या सत्कार सोहळ्यात मुख्यमंत्री यादव म्हणाले, "संपूर्ण देशाला अभिमान वाटेल, अशी कामगिरी क्रांतीने केली आहे. तिच्या कुटुंबाच्या अडचणींबद्दल मला माहिती मिळाली आहे. राज्य सरकार सध्याच्या नियमानुसार तिच्या वडिलांना पुन्हा कामावर घेण्यासाठी आम्ही नक्कीच प्रयत्न करू." मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा करताच लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.क्रांतीचे वडील मुन्ना सिंह यादव यांना २०१२ साली पोलीस दलातून काढण्यात आले. त्यानंतर क्रांतीच्या कुटुंबाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. एक काळ असा होता जेव्हा दिवसाचे एकावेळचे अन्न मिळवण्यासाठीही संघर्ष करावा लागत होता, अशी दुखद आठवण क्रांती गौडने सांगितली. मात्र विश्वचषक जिंकल्यानंतर तिच्यासह कुटुंबियांनाही चांगले दिवस आले.क्रांती गौडने सांगितले की, कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तिच्या भावाला रोजंदारीवर काम करावे लागले. तसेच त्याने बस कंडक्टर म्हणूनही काम केले. क्रांती गौडच्या कामगिरीमुळे तिच्या संपूर्ण कुटुंबाच्या मेहनतीचे चीज झाल्याची भावना व्यक्त केली

### नोकरी परत मिळण्याचा मार्ग मोकळा

तिच्या कुटुंबाच्या अडचणींबद्दल मला माहिती मिळाली आहे. राज्य सरकार सध्याच्या नियमानुसार तिच्या वडिलांना पुन्हा कामावर घेण्यासाठी आम्ही नक्कीच प्रयत्न करू." मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा करताच लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.क्रांतीचे वडील मुन्ना सिंह यादव यांना २०१२ साली पोलीस दलातून काढण्यात आले. त्यानंतर क्रांतीच्या कुटुंबाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. एक काळ असा होता जेव्हा दिवसाचे एकावेळचे अन्न मिळवण्यासाठीही संघर्ष करावा लागत होता, अशी दुखद आठवण क्रांती गौडने सांगितली.

जात आहे. मुख्यमंत्री डॉ. यादव यांनी क्रांती गौडच्या सन्मानार्थ १५ नोव्हेंबर रोजी जबलपूरमध्ये बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आदिवासी अभिमान दिन साजरा करण्याचे आश्वासन दिले.तसेच छतरपूरमध्ये नवीन क्रिकेट स्टेडियम बांधण्याचीही घोषणा केली. क्रांती गौडने नुकत्याच झालेल्या विश्वचषकात ८ सामन्यात ९ विकेट्स घेतल्या. पाकिस्तानविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात तिने तिची सर्वोच्च कामगिरी केली. या सामन्यात तिने २० धावा देऊन ३ विकेट्स घेतल्या.सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरोधात खेळत असताना क्रांती गौडने महत्त्वाची विकेट घेऊन ऑस्ट्रेलियाला आणखी मोठी धावसंख्या रचण्यापासून काहीप्रमाणात रोखले होते. शतकवीर ॲलिसा हिलीला बाद करून गौडने मोठी कामगिरी केली.क्रांती गौडचे वडील मध्य प्रदेशच्या छतरपूर जिल्ह्यातील पोलीस दलात अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांना २०१२ साली चुकीच्या पद्धतीने काढून टाकण्यात आले. काही दिवसांपूर्वी टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत क्रांतीने वडिलांचा गौरव परत मिळावा, अशी इच्छा व्यक्त केली होती. शुक्रवारी भोपाळमध्ये मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या हस्ते क्रांती गौडचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वडिलांना पुन्हा नोकरीवर घेण्याचे प्रयत्न करू असे आश्वासन दिले.भोपाळमध्ये झालेल्या सत्कार सोहळ्यात मुख्यमंत्री यादव म्हणाले.

# 'आप'चा आमदार देशातून फरार!

## आम आदमी पक्षाचा आ. ऑस्ट्रेलियाला पळून गेल्याचा प्रकार समोर

। नवी दिल्ली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंजाबमधील आम आदमी पक्षाचे खासदार हरमित सिंग पठानमाजरा हे २ सप्टेंबरपासून एका बलात्काराच्या प्रकरणात फरार आहेत. आता हे आमदार ऑस्ट्रेलियाला पळून गेल्याची बाब समोर आली आहे. एक व्हिडीओ मुलाखत समोर आल्यानंतर हा प्रकार उजेडात आला आहे.**

सानौर येथील आमदार लपून बसल्याची शक्यता असण्याची शक्यता असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणावर पोलिसांकडून छापेमारी केली जात होती. आता हा आमदार ऑस्ट्रेलियात पळून गेल्याचे समजल्यानंतर पोलिसांसाठी ही शरमेची बाब ठरली आहे. पटियाला पोलिसांनी देखील या आम आदमी पक्षाच्या आमदाराविरोधात लुक आउट नोटीस जारी केली आहे.

पठानमाजरा हे शुक्रवारी ऑस्ट्रेलियामधील एका पंजाबी वेब चॅनेलला दिलेल्या व्हिडिओ मुलाखतीत दिसून आले, ज्यामध्ये त्यांनी दावा केला की ते 'जामीन मिळाल्यावरच घरी परततील'. विशेष म्हणजे त्यांनी स्वतःवरचे सर्व आरोप फेटाळून लावले आणि हे प्रकरण पंजाबच्या लोकांचा आवाज बंद करण्यासाठी रचलेले एक राजकीय षडयंत्र असल्याचे म्हटले आहे.पंजाबमध्ये मंत्री आणि



आमदारांशी महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली जात नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध लादले जात आहेत. दिल्लीत पराभव झाल्यानंतर, त्या नेत्यांनी पंजाबचा ताबा घेतला आहे आणि ते त्याच पद्धतीने ते चालवत आहेत," असा आरोप त्यांनी केला. याबरोबरच त्यांनी न्याय व्यवस्थेवर पूर्ण विश्वास असल्याचेही सांगितले. "बलात्कार प्रकरणात हजर न राहिल्याने पटियाला कोर्टाने पठानमाजरा यांच्याविरुद्ध 'घोषित अपराधी' (PROCLAIMED OFFENDER)

### तक्रारीनंतर गुन्हा दाखल

१ सप्टेंबर रोजी पोलिसांनी सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्यात आप आमदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. झिरकापूर येथील एका महिलेच्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या महिलेचा आरोप आहे की, आमदारांनी स्वतःचा घटस्फोट झाला असल्याचे खोटे सांगितले, तिच्यासोबत संबंध ठेवले आणि नंतर २०२१ मध्ये आधीच विवाहित असतानाही तिच्याशी लग्न केले.

म्हणून कारवाई आधीच सुरू केली आहे.पंजाब पोलीस जेव्हा हरियाणाच्या कर्नाल येथे त्यांना अटक करण्यासाठी गेले तेव्हा हे आमदार पोलिसांच्या तावडीतून पळून गेले.

तेव्हा पोलिसांनी दावा केला होता की, आमदार कर्नाल जिल्ह्यातील दाबरी गावात त्यांच्या एका नातेवाईकाच्या घरी असताना, त्यांना अटक करण्यासाठी पोलीस पथक गेले होते. तेव्हा आमदाराच्या समर्थकांनी गोळीबार आणि दगडफेक केली. मात्र पठानमाजरा यांनी गोळीबारात सहभागाचा आरोप फेटाळून लावला आहे आणि त्यांचे फेक एन्काउंटर केले जाऊ शकते हे कळाल्यानंतर आपण पळून गेल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# समजा आपण त्या जागी असतो तर : विशाखा सुभेदार

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट पसरली आहे. या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले. अशातच, सोशल मीडियावर पहलगाम हल्ल्याबद्दल विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) लिहिलेल्या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) फेसबुकवर ही पोस्ट लिहिली आहे. तिने लिहिलं की, इंटरनेट, सोशल



मीडिया सध्या सगळीकडे एकाच विषयावर बोलणं सुरू आहे पहलगाममध्ये घडलेली भयावह घटना... हिंसेला, आतंकवादाला वृत्ती जबाबदार की मती? ‘असं व्हायला नको!’, ‘तसं व्हायला हवं’, ‘यांनी हे करायला हवं’, ‘त्यांनी तसं बोलायला हवं’ पण ज्यांच्यावर तो प्रसंग ओढवला त्यांनी काय करायचं? आपलं माणूस गमावल्याचं दुःख, शोक करायचा आणि जाब विचारायचा तर तो कोणाला? ही गमावलेली माणसं येतील का परत?पुढे विशाखा सुभेदार लिहिलं, “जात, धर्म, वर्ण, भेद त्याचं केलं जाणारं राजकारण अशा आणि बऱ्याच गोष्टी आहेत. पण एखाद्या निष्पाप माणसाला जीवे मारण्याची वृत्ती ही येते कशी आणि कुठून? ही शिकवण देणारे आणि ती आपल्या चांगल्याचसाठी आहे हे मानणाऱ्यांना कसे थांबवायचे?

# राखीचा बुरखा घालून व्हिडीओ

गेल्या सहा वर्षांतील सर्वात मोठा दहशतवादी हल्ला २२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झाला. पहलगाम येथील ‘छोटे स्वित्झर्लंड’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यामुळे सर्व स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भारतच नाही तर जगभरातून या दहशतवादी हल्ल्याविरोधात निषेध व्यक्त केला जात आहे. बॉलीवूड सेलिब्रिटी संताप व्यक्त करताना दिसत आहे. अशातच सुनील शेट्टीने पुढची सुट्टी काश्मीरमध्ये एन्जॉय करणार असल्याचं सांगितलं. तसंच राखी सावंतने देखील काश्मीर जाण्याचा निर्धार केला आहे. ती चाहत्यांना काश्मीर जाण्याचं आवाहन करताना दिसत आहे. राखी सावंतने तिच्या इन्स्टाग्राम पेजवर नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये ती बुरखा घालून संवाद साधताना दिसत आहे. राखी म्हणते, “सलाम वालेकुम सभी को, नमस्ते, सत श्री अकाल, जय भारत, जय भीम, जय हिंदुस्तान, भारत माता की जय. आता आनंदी आहात. आपण सगळे एक आहोत. आपल्या हिंदुस्तानातून मुस्लिमांना कोणीही बाहेर काढू शकत नाही. भारत जितका हिंदूंचा आहे, तितकाच मुसलमानांचा देखील आहे. हिंदू-मुस्लिम असं करू नका. लहान मुलांसारख वागू नका. मोठे व्हा. जरा देवावर दया करा. देवाला इतक्या वेदना होतं आहेत की, मी या लोकांना निर्माण केलं आहे आणि ही सर्व माझी मुलं आहेत, माझी माणसं आहेत. पण, का लढत आहेत आणि मरत आहेत. यांना काय पाहिजे?”



# नवीना बोलेने साजिदवर गंभीर आरोप केले

बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो. मुख्यत: या क्षेत्रात काम करताना अनेक महिला कलाकारांना अशा घटनांचा अधिक सामना करावा लागतो. असंच एका कलाकाराबरोबरही झालं होतं आणि ही कलाकार म्हणजे बॉलीवूडमधील लोकप्रिय व विनोदी अभिनेते जॉनी लिवर (JOHNNY LEVER) यांची मुलगी जेमी लिवर (JAMIE LEVER). जेमीला तिच्या लूकमुळे नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागला होता.जॉनी लिवर यांनी आजवर अनेक सुपरहिट हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आपल्या विनोदी भूमिकांनी त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांची मुलगी जेमी लिवर हिनं या क्षेत्रात पदार्पण केलं आहे. मात्र, इतर स्टार किड्सप्रमाणे तिला अगदी सहज प्रसिद्धी मिळालेली नाही. ती संघर्ष करीत या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तिच्या दिसण्यामुळे तिला खूप त्रास झाला होता आणि यामुळे तिच्यावर टीकाही झाली होती.जेमी लिवरनं अलीकडेच टीव्ही अभिनेत्री छवी मित्तलच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिनं काही वर्षांत लोकांच्या मताचा आणि टीकेचा कसा सामना केला आणि याचा तिच्यावर कसा परिणाम झाला याबद्दल सांगितलं. बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो.



# सूरज आमच्या घरी आला होता: निक्की तांबोळी

केदार शिंदे दिग्दर्शित ‘झापुक झुपूक’ हा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २५ एप्रिल २०२५ ला हा चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट उत्तम कमाई करीत असल्याचे समोर आलेल्या आकडेवारीवरून दिसत आहे. ‘झापुक झुपूक’ या चित्रपटात सूरज चव्हाण, जुई भागवत, इंद्रनील कामत हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसत आहेत. आता निक्की तांबोळीने सूरज चव्हाणच्या चाहत्यांसाठी एक खास गोष्ट केली आहे. तिने सूरजच्या चाहत्यांसाठी झापुक झुपूक या सिनेमासाठी थिएटर बुक केले आहे.‘नवशक्ती’ या चॅनेलने निक्की तांबोळीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. या व्हिडीओमध्ये निक्की तांबोळी म्हणते, “काही दिवसांपूर्वी सूरज चव्हाण आमच्या घरी आला होता. त्याला शुभेच्छा देण्यासाठी मी एक व्हिडीओ बनवला होता. ज्यामध्ये मी म्हटलं होतं की त्याच्या चाहत्यांना मी त्याच्या चित्रपटांची तिकिटे देईन. त्यानंतर मला बरेच मेसेज आले. मग मी ठरवलं की, सूरजच्या चाहत्यांसाठी थेट शो बुक करते.निक्की तांबोळी पुढे म्हणाली, “सध्या मी उद्याचे दोन शो आधीच बुक केले आहेत. पुण्यातील मंगला थिएटरचा ७ चा शो आणि सिटी प्राइड कोथरूडला दुपारी ४ चा शो बुक केला आहे. त्यामुळे जे पुण्यात आहेत, त्यांनी नक्की भेट द्या.”पुढे निक्की तांबोळीने असेही म्हटले की, मला हा सिनेमा खूप आवडला आहे.

इंडियाचा सुपरफ्लॉप शो! सुपर सिक्सेसमध्ये टीम इंडियाचा सुपरफ्लॉप शो!

# हाँगकाँगमध्ये टीम इंडियाचा सुपरफ्लॉप शो!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हाँगकाँग सुपर सिक्सेस २०२५ स्पर्धेत भारतीय संघाचा सुपरफ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार अवघ्या २ धावांनी विजय मिळवला होता. हा भारताचा या स्पर्धेतील एकमेव विजय ठरला. कारण त्यानंतर पुढील चारही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे भारतीय संघाचा या स्पर्धेतील प्रवास इथेच संपला आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानचा संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे.**

## भारताचा या स्पर्धेतील एकमेव विजय



## स्पर्धेतील प्रवास इथेच संपला

हाँगकाँग सुपर सिक्सेस २०२५ स्पर्धेत भारतीय संघाचा सुपरफ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार अवघ्या २ धावांनी विजय मिळवला होता. हा भारताचा या स्पर्धेतील एकमेव विजय ठरला. कारण त्यानंतर पुढील चारही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे भारतीय संघाचा या स्पर्धेतील प्रवास इथेच संपला आहे.


भारतीय संघ रविवारी (९ नोव्हेंबर) स्पर्धेतील शेवटचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला. भारताचा शेवटचा सामना श्रीलंकेविरुद्ध पार पडला. या सामन्यातही भारतीय संघाला ४८ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला आहे. या सामन्यात दिनेश कार्तिकला विश्रांती दिली गेली होती. त्याच्या जागी स्टुअर्ट बिन्नी भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून आला.या स्पर्धेत भारतीय संघाचा पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध पार पडला. या सामन्यात पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे सामन्याचा निकाल डकवर्थ लुईस नियमानुसार लागला. भारतीय संघ २ धावांनी पुढे होता. त्यामुळे भारतीय संघाने विजयाने सुरुवात केली. पण त्यानंतर पुढील चारही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. मुख्य बाब म्हणजे भारतीय संघाला युएई, कुवेत, नेपाळ आणि श्रीलंकेकडून पराभवाचा सामना करावा लागला. सलग ३ पराभवानंतर भारतीय संघाचा प्रवास इथेच संपला होता. पण श्रीलंकेला पराभूत करून भारतीय संघ शेवट गोड करेल असं वाटलं होतं. पण असं काहीच झालं नाही. दिनेश कार्तिकऐवजी स्टुअर्ट बिन्नीने संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली आणि सामना ४८ धावांनी गमावला. या सामन्यात श्रीलंकेचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ६ गडी बाद १३८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला ३ गडी बाद ९० धावांपर्यंत मजल मारता आली. भारतीय संघाकडून भरत चिप्लीने ४१ आणि कर्णधार स्टुअर्ट बिन्नीने नाबाद २५ धावांची खेळी केली. गोलंदाजीसह फलंदाजीतही भारतीय खेळाडू मागे राहिले. त्यामुळे हा सामना गमवावा लागला. हाँगकाँग सुपर सिक्सेस २०२५ स्पर्धेत भारतीय संघाचा सुपरफ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार अवघ्या २ धावांनी विजय मिळवला होता. हा भारताचा या स्पर्धेतील एकमेव विजय ठरला. कारण त्यानंतर पुढील चारही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे भारतीय संघाचा या स्पर्धेतील प्रवास इथेच संपला आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानचा संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. भारतीय संघ रविवारी (९ नोव्हेंबर) स्पर्धेतील शेवटचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला. भारताचा शेवटचा सामना श्रीलंकेविरुद्ध पार पडला. या सामन्यातही भारतीय संघाला ४८ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला आहे. या सामन्यात दिनेश कार्तिकला विश्रांती दिली गेली होती. त्याच्या जागी स्टुअर्ट बिन्नी भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून आला.या स्पर्धेत भारतीय संघाचा पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध पार पडला. या सामन्यात पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे सामन्याचा निकाल डकवर्थ लुईस नियमानुसार लागला. भारतीय संघ २ धावांनी पुढे होता. त्यामुळे भारतीय संघाने विजयाने सुरुवात केली. पण त्यानंतर पुढील चारही सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. मुख्य बाब म्हणजे भारतीय संघाला युएई, कुवेत, नेपाळ आणि श्रीलंकेकडून पराभवाचा सामना करावा लागला.सलग ३ पराभवानंतर भारतीय संघाचा प्रवास इथेच संपला होता. पण श्रीलंकेला पराभूत करून भारतीय संघ शेवट गोड करेल असं वाटलं होतं. पण असं काहीच झालं नाही. दिनेश कार्तिकऐवजी स्टुअर्ट बिन्नीने संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली आणि सामना ४८ धावांनी गमावला. या सामन्यात श्रीलंकेचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ६ गडी बाद १३८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला ३ गडी बाद ९० धावांपर्यंत मजल मारता आली. भारतीय संघाकडून भरत चिप्लीने ४१ आणि कर्णधार स्टुअर्ट बिन्नीने नाबाद २५ धावांची खेळी केली.

# वीज चमकताच सामना थांबला!

## सामन्यात लागू झाला क्रिकेटमधील 30:30 नियम

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत भारतीय संघाने २-१ ने बाजी मारली. मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने बाजी मारली. त्यानंतर पुढील दोन्ही सामने जिंकून भारतीय संघाने २-१ ने आघाडी घेतली. मालिकेतील शेवटचा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक होता. पण हा सामना पावसामुळे पूर्ण होऊ शकला नाही.**



## खेळाडूंना रुममध्ये जाण्यास सांगितले

पण वीज चमकताना दिसताच, अंपायर लगेचच टायमर लावतात. अंपायर ३० सेकंद वाट पाहतात. जर ३० सेकंदाच्या आत गडगडाट ऐकून आला, तर अंपायर तत्काळ खेळ थांबवतात आणि खेळाडूंना ड्रेसिंग रुममध्ये जाण्यास सांगतात. यासह प्रेक्षकांनाही सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगितलं जातं.या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता.

त्यामुळे भारतीय संघाने मालिकेत २-१ ने विजय मिळवला. पण सामना नेमका का थांबला आणि क्रिकेटमधील ३०-३० नियम काय आहे? जाणून घ्या.क्रिकेटच्या मैदानावर सामना थांबण्याची काही महत्वाची कारणं असतात. पाऊस आला किंवा प्रकाश कमी असेल, तर सामना थांबवला जातो. पण वीज आणि ढगांच्या गडगडाटामुळे सामना थांबणं हे क्वचितच पाहायला मिळतं. कारण पावसामुळे बऱ्याचदा सामने थांबले आहेत. पण वीज आणि ढगांच्या गडगडाटामुळे सामना थांबवत नाहीत. पण भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेला पाचवा टी-२० सामना वीज चमकल्यामुळे थांबवण्यात आला. हा सामना ३०:३० नियमानुसार थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान हा नियम नेमका काय आहे?अंपायर सायमन टॉफेल यांनी एका शोमध्ये समजावून सांगितला आहे.गेल्या ५-६ वर्षांपासून आयसीसीने विजेसंदर्भातील एक महत्वाचा नियम लागू केला आहे. हा नियम ३०:३० नियम म्हणून ओळखला जातो. ऑस्ट्रेलियात सामना सुरू असताना पाऊस पडणं वीज चमकणे ही सामान्य गोष्ट आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 10 नोव्हेंबर 2025 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महापालिकेकडून तयारी सुरु

# पिंपरीची आरक्षण सोडत मंगळवारी!

### चिंचवडच्या रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या आवारात लागले फ्लेक्स

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत मंगळवारी (दि.११) काढण्यात येणार आहे. सोडत प्रक्रिया चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी 11 वाजता सुरू होणार आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने तयारीस सुरुवात केली असून, तसे जाहीर प्रकटन शनिवारी (दि.८) प्रसिद्ध करण्यात आले आहेत. प्रेक्षागृहाच्या आवारात सोडतीचे माहिती देणारे फ्लेक्स लावण्यात आले आहेत.**



महापालिकेत एकूण १२८ जागा आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीसाठी (एससी) २० आणि अनुसूचित जमातीसाठी (एसटी) ३ जागा राखीव आहेत. एससीतील २० पैकी १० जागा महिलांसाठी राखीव आहेत. तर, एसटीच्या ३ जागांपैकी २ जागा महिलांसाठी आरक्षित आहेत, तसेच इतर मागासवर्ग (ओबीसी) आणि सर्वसाधारण खुल्या (ओपन) गटातील निम्मा जागा या महिलांसाठी राखीव आहेत. महिला जागांसाठी राखीव असलेल्या जागेची चिठ्ठी या सोडतीत काढली जाणार आहे.

त्या संदर्भातील महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी जाहीर प्रकटन शनिवारी (दि.८) प्रसिद्ध केले आहे. आरक्षण सोडत मंगळवारी काढली जाणार आहे. त्यासाठी प्रेक्षागृहाच्या आवारात सोडत, हरकत व सूचना संदर्भातील माहितीचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. दरम्यान, सोमवारी (दि.१०) महापालिकेच्या वतीने प्रेक्षागृहात सोडतीची रंगीत तालीम घेतली जाणार आहे. नेमून दिलेले अधिकारी व कर्मचारी त्यावेळी हजर असणार आहेत. सोडत प्रक्रियेत कोणतेही चूक होऊ नये म्हणून रंगीत तालीम घेतली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या सोडतीबाबत इच्छुकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. कोणती जागा महिला आरक्षित होणार, याकडे त्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## लोकलचे वेळापत्रक बिघडल्याने प्रवाशांना मनस्ताप!

### पुणे लोणावळा दररोज प्रवास करणाऱ्यांचा अनेकदा 'लेट मार्क

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

पुणे लोणावळा लोकल सध्या उशिराने धावत आहे. त्यामुळे रोज पुणे-लोणावळा प्रवास करणाऱ्या असंख्य कर्मचाऱ्यांचा अनेकदा 'लेट मार्क' लागतो. याशिवाय शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनाही उशीर होतो. त्यामुळे लोकलचे परिचालन वेळेत व्हावे, अशी मागणी प्रवाशांची मागणी आहे.



दिवाळी आणि छठ पुजेनिमित्त रेल्वे प्रशासनाने जादा एक्स्प्रेस गाड्या सोडल्या आहेत, उत्तर आणि दक्षिण भारतात जाणाऱ्या बहुतांश गाड्या पुण्यामार्गे जात आहेत. पुणे ते लोणावळा दरम्यान केवळ दोनच ट्रॅक आहेत. गेल्या काही दिवसांपासून हा लोहमार्ग व्यस्त आहे. जादा गाड्यांचा पुणे-लोणावळा लोकल सेवेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पुण्यातून रोज सरकारी कर्मचारी, शिक्षक, बँक कर्मचारी, व्यापारी, विद्यार्थी लोणावळ्याला शिवाजीनगर स्थानकावरून सकाळी ८:१० वाजता लोकल सुटते.

सर्व थांबे घेत निर्धारित वेळेनुसार सकाळी ९:२५ वाजता ती लोणावळा रेल्वे स्थानकावर पोहोचते. सकाळी दहाच्या आत ती लोणावळ्यात पोहोचते. त्यामुळे लोणावळ्याला कामानिमित्त रोज प्रवास करणारे प्रवासी ही लोकल पकडतात. गेल्या काही दिवसांपासून लोकल 'साइड ट्रैक'ला काढून एक्स्प्रेस गाड्यांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे लोकलचे वेळापत्रक कोलमडले. लोकलचा वेगही कमी असतो. सततच्या 'लेट मार्क मुळे रजा लागणे, वेतन कापले जाणे, कामावर उशिरा पोहोचणे यांसारखे समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

> चिंचवड, तळेगाव किंवा मळवली यापैकी एखाद्या स्थानकावर किंवा प्रत्येक ठिकाणी थांबवली जाते. लोणावळ्याला जाईपर्यंत लोकलला २५ ते ३० मिनिटे उशीर झालेला असतो. आठवड्यातून पाच दिवस तरी या प्रमाणेच समस्या भेडसावत आहे.
> **-विकास कदम,** चिंचवड

> लोकल ट्रेनला काही वेळेला उशीर होतो वेळा तांत्रिक कारणांमुळे थोडा जास्त उशीर झाला होता. पण गाड्या लोकल ट्रेनला कधीतरी सात ते आठ मिनिटे उशीर सध्या होत आहे. नेहमी वेळेवरच गाड्या सोडण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असतो.
> **-हेमंतकुमार बेहरा,** जनसंपर्क अधिकारी, पुणे रेल्वे विभाग


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS
THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046